Publication: Prahaar
Date: 1/6/2019
Page: 2
Column: 1

प्रहार
शनिवार, १ जून २०१९

वेचक

# अदानी इलेक्ट्रिसिटीच्या ग्राहक सेवेचा नवीन नंबर जाहीर

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) या वीज कंपनीने ग्राहक सेवेसाठी १९१२२ हा क्रमांक ठेवला आहे. हा क्रमांक सोपा व लक्षात ठेवण्यास सोयीचा असेल अशा दृष्टीने निश्चित करण्यात आला आहे. मराठी, हिंदी आणि इंग्लिश अशी बहुभाषिक सेवा या क्रमांकावर उपलब्ध आहे. हा ग्राहकसेवा क्रमांक २४७७ उपलब्ध असून मुंबईतील सर्व टेलीकॉम ऑपरेटर्समार्फत त्यावर कॉल करता येईल. नवीन ग्राहक सेवा क्रमांक कॉल करणाऱ्याला आयव्हीआरच्या मार्फत आठ सुलभ पर्याय दिले जातात. आग किंवा विजेचा धक्का बसत असल्यास, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे इमारतीतील लिफ्टच्या सुविधेत अडथळा निर्माण झाल्यास, उत्खनन किंवा वीजचोरी झाल्यास अधिक तातडीचा व महत्त्वपूर्ण पर्याय आहे. या तक्रारींना अग्रक्रम देण्यात आला आहे. नवीन जोडणी, वीजपुरवठा खंडित होणे आणि पेमेंटशी संबंधित शंकांचा क्रमांक त्यानंतर लागतो.